समर्थ संजय तुरंबेकर

# पैशांचा मृत्यू -1.

डॉक्टर जीवन परब हा मूळचा गर्भश्रीमंत तरूण. तो खूप शिकलेला डॉक्टर पण,त्याला पेशंट तपासण्यात काहीच रस नव्हता . त्याला आवड होती ती 'हेरगिरी'ची, त्यामुळे त्याने चालत्या क्लिनिकला खीळ ठोकून भारतीय मिलिटरीच्या ‘गुप्तहेर’ खात्यात जायचे ठरवले;पण,त्याने कुठेही नोकरी न करता आपल्याला बिझनेस मध्ये हातभार लावावा, अशी जीवनच्या वडिलांची इच्छा होती. मात्र तो काही ऐकायला तयार नव्हता,शेवटी भारतीय हेरखात्यात तो शिक्षणाच्या जोरावर; अधिकारी म्हणून ‘कर्नल’पदावर रुजू झाला. आता लोक त्याला हळूहळू डॉक्टर परब ऐवजी, कर्नल परब किंवा डिटेक्टिव्ह जीवन म्हणू लागले होते.

भारतीय हेरखात्यात जरी तो नवीन असला, शिक्षणाच्या जोरावर जरी तो उंच पदावर पोहोचला असला तरी, त्याच्याइतका धूर्त व धाडसी हेर भारतीय हेरखात्यात शोधून सापडणारा नव्हता. पण त्याने बिझनेससाठी हेरगिरी सोडावी हे कोणत्याही वरिष्ठ अधिकाऱ्याला सांगून पटण्यासारखे नव्हते,त्याला अनेकांनी समजावण्याचा प्रयत्न केला मात्र जीवनने केवळ त्याच्या वडिलांच्या शेवटच्या ईच्छेसाठी, बिझनेस उंचावर नेण्यासाठी,आपल्या सर्वोत्तम हेरगिरीचा बळी दिला होता.

बिझनेसची गाडी मोठ्या वळणावर येऊन ठेपते न ठेपते तोच जीवनाच्या वडिलांचे निधन झाले,बिझनेस सांभाळण्यासाठी जीवनने हेरगिरी सोडायचे ठरवले,शिवाय त्याच्या उत्तम ड्युटीने भारतीय सरकार कडून त्याला निवृत्तीवेतनही मिळणार होते आणि जरी ते मिळाले नाही, तरी जीवनला भागण्यासारखे होते. जीवन ने हेरगिरीतून राजीनामा देण्याआधी शेवटचे काम संपवून त्याचा रिपोर्ट व फाइल वरिष्ठांकडे द्यायचे होते. सर्वकाही झाले,फाईल देण्याचा दिवसही ठरला. आता फक्त बिझनेसकडेच लक्ष केंद्रित करायचे असे त्याने ठरवले होते.

जीवनला नेमबाजीचा छंद होता. तो दरदिवशी ठराविक वेळेला मार्गदर्शकाकडे जाऊन,आपली नेमबाजी आणखी प्रगत करण्याचा सराव करी. फाईल द्यायच्या दिवशी मात्र,गोळीबाराला जास्त वेळ न देता निघून घरी यायचे व फाईल घेऊन ‘कार’ने दिलेल्या वेळेत,सांगितलेल्या ठिकाणी पोहोचायचे असे त्याने ठरवले. मात्र सरावाला जाताना तो नेहमीप्रमाणे ‘कार’ने न जाता दुचाकीवरून जाणार होता. ती दुचाकी हेरगिरीसाठी खास स्वतः बनवली होती त्याने,पण आता फक्त हेरगिरी संपल्याकारणाने त्या दुचाकीला कोनाड्यात ठेवून गंजवण्याची निदान त्याची तरी तयारी नव्हती. जरी त्याच्याकडे पैशांची,गाड्यांची कमी नसली तरी,स्वतः तयार केलेल्या त्या दुचाकीचे त्याला फार महत्त्व होते. तो अशा अनेक गाड्या घेऊ शकत होता, पण त्या दुचाकी ने त्याला अनेक कामांमध्ये मदत केली होती,अनेकदा हेरगिरी करताना तो तीचा कौशल्याने वापर करी,म्हणूनच जीवनला त्याच्याकडील इतर वाहनांपेक्षा त्या दुचाकीचे महत्त्व फार होते. ती दुचाकी विजेवर चालत असल्याने सामान्य दुचाकींना ज्या ठिकाणी इंजिन असते त्या ठिकाणी त्या दुचाकीला बॅट्र्या बसवलेल्या होत्या,शिवाय इंजिन नसल्याने त्या दुचाकीचा, चालवताना अथवा चालू करताना बिलकुल आवाज होत नसे. बाजूने गेली तरी कळणार नाही इतक्या सफाईदारपणे तिची रचना करण्यात आली होती.

जीवन दरवेळप्रमाणे आपल्या गोळीबाराच्या सरावासाठी जायला निघाला. आज तो दुचाकीवरून निघाला,तेसुद्धा त्याच्या 'स्टँडर्ड' दुचाकीवरून. तिच्यावरून त्याने अनेक छुपे पराक्रम गाजवले होते. त्याने त्या दुचाकीचा उपयोग सामान्य

ये-जा करण्यासाठी कधीच केला नव्हता, पण तो आज तसे करणार होता. म्हणून तो आत्ताही पराक्रम गाजविण्यासाठीच चालला आहे,असे त्याला सारखे वाटत होते. पण त्याला कुठे माहित होते, की त्याला जे वाटत आहे,ते सत्य आहे!!

मार्गदर्शकाकडे पोहोचताच त्याने वेळ न घालवता सरावाला सुरुवात केली, त्याठिकाणी त्याच्याइतका अचूक नेमबाज नव्हता,बराच वेळ निघून गेला. त्याचे सरावात नेहमीप्रमाणे लक्ष लागत नव्हते, तो होता वेगळ्याच विचारात,'फाईलच्या'.त्याचा नेम चुकत होता याचेही भान त्याला राहिले नव्हते. त्याला रोज पाहणारे आणि त्याचा मार्गदर्शक गोंधळात पडले. “काय झालं ? आज टेन्शनमध्ये दिसताय.” मार्गदर्शक म्हणाला "काही नाही, एकदा एक निर्णय घेऊन त्यावर ठाम राहायचं ठरवलं मात्र मनातला घोळ काही थांबतच नाहीये." जीवनने उत्तर दिले, त्यावर मार्गदर्शक म्हणाला "हे बघ जीवन मी तुला तुझ्या छंदाचा मार्गदर्शक म्हणून नाही,तर तुझ्या वडिलांचा मित्र म्हणून एक सल्ला देऊ इच्छितो. तुझे विचार हे तुझ्या मनातले घोळ नसून तुझ्या हृदय आणि मेंदू मधील भांडण आहे, मात्र यात हृदयाने कितीही गयावया केली तरी मेंदूचेच ऐकायचे कारण, माझ्या या वाक्यांना अनुभवाचा आधार आहे शिवाय प्रकृतीनेही मेंदूचे स्थान हृदयाच्या 'वर'च दिले आहे." साडेसहा वाजले होते,सात वाजता त्याला सांगितलेल्या ठिकाणी फाईल घेऊन पोहोचायचे होते, हे ध्यानात येताच तो घाईघाईत निघून गेला.

## ⁎ पैशांचा मृत्यू - 2

एका एकांतात वसलेल्या बंगल्यासमोरील आवारात भर‘दुपारी’ एक काळया रंगाची व्हॅन येऊन थांबली. त्या व्हॅनमध्ये ड्रायव्हर धरून एकूण पाचजण होते. ड्रायव्हर सोडून मागील चारजण पटापट व्हॅन मधून खाली उतरले,व बंगल्याच्या मागच्या दिशेने जाऊ लागले. ड्रायव्हरने जास्त मागेपुढे न करता व्हॅन पार्क केली आणि तो आपल्या साथीदारांची वाट पाहू लागला.

" आपण अगदी बरोबर वेळेत पोहोचलोय असं दिसतय", त्यातील एक जण म्हणाला. "होय मग! बंगल्याची निवड केलीय कोणी ?" ,"अरे जयसिंग, हे काम करण्यासाठीच तर तुला तात्याने आणि मी या गँगमध्ये सामिल केलं आणि सय्यद अरे लवकर उघड तो टाळा, तो जेवायला गेलेला वॉचमॅन परत आला तर तुला घरफोडींच्या केस पासून कोणीच वाचवू शकणार नाही!" जॉन मस्करीच्या स्वरात म्हणाला.सुमारे पंधरा मिनिटांनी सय्यदने ते मोठाले कुलूप उघडण्यात यश मिळवले. "हुसेन जरा जा आणि बघ कोणी येते का" एवढे बोलून हडकुळ्या देहाचा जॉन;जयसिंग व सय्यद सोबत बंगल्यात गेला. "पटापट झडती घ्या या बंगल्याची आणि सापडलेले सगळे पैसे,दागिने सगळं या गोणीत भरा, आणखीन गोण्या लागल्या तर आहेत आपल्याकडे",जॉनने हुकुम सोडताच दोघेही कामाला लागले भरलेल्या दोन गोण्या व्हॅनमध्ये ठेवून सय्यद बंगल्यात आला, त्यावेळी जॉन आपल्याला या बंगल्यातून आणखी काही लाभ होतो का हे पाहत होता. सय्यद थकलेला पाहून जॉन आणि जयसिंग त्याला शेवटची गोण न्यायला हातभार लावू लागले "वॉचमेन आला, वॉचमेन आला घाई करा" हुसेन व्हॅन कडे धावत ओरडला,तोच त्यांनी ती गोण अचानक डिक्कीत भिरकावली,आणि आपल्या साथीदाराच्या ओरडण्याने घाबरलेला,ड्रायव्हिंग सीटवरील तात्या आणखीनच घाबरला. त्याने ओरडणे ऐकताच व्हॅन सुरू केली होती. डिक्की धाडकन बंद करून चौघेजण व्हॅनमध्ये घुसले होते. व्हॅन,दरवाजा बंद करण्याआधीच पुढे निघाली तेव्हा व्हॅनपुढील असलेल्या रोपांच्या कुंड्या चिरडल्या गेल्या, माती सर्वत्र पसरली. पसरलेल्या मातीत आपल्या चाकांचे छाप सोडत ते वाहन भरधाव वेगात गेट मधून निघून गेले आणि मागुन धावत ओरडत येणारा बंगल्याचा राखणदार आता,स्तब्ध होऊन दूर दूर जाणाऱ्या व्हॅनकडे पाहत होता. आता आपली नोकरी जाते की काय,या विचारानेच तो पागल बनला होता.

## * पैशांचा मृत्य - 3

एक श्रीमंत तरूण भर वेगात दुचाकी घेऊन एका एकांतात वसलेल्या बंगल्या समोर आला, आणि जरी त्याने सामान्य तऱ्हेने दुचाकी पार्क केली तरी आवाज मात्र बिलकुल झाला नव्हता. त्यावेळी जवळजवळ ‘संध्याकाळचे’ सात-पावणेसात वाजले होते. बंगल्यातील दिवे चालू असलेले पाहून त्या तरुणाचे डोके फिरले होते. आता तो 'जीवन' राहिला नव्हता,त्याच्या डोक्यात ‘कर्नल’च्या शोधक वृत्तीने प्रवेश केला केला होता . त्याने आवाज न करता चालायला सुरुवात केली, आणि तो बंगल्याच्या एका खिडकीजवळ आला. खिडकी उंचावर होती मात्र त्याखालील ग्रिलची खिडकी समोरच होती. आता, त्याने हळूहळू ग्रीलवर चढायला सुरुवात केली. त्याने ग्रीलच्या साह्याने वरची खिडकी गाठली, व ती हळूच उघडली ती सुद्धा एका विशिष्ट हत्याराने. जर ते आज तो कुठे विसरला असता, तर ती खिडकी बाहेरून उघडणे त्याला जन्मात जमले नसते. तो या हत्याराने कोणतीही खिडकी सहज उघडू शकत होता तो आवाज होऊ न देता, त्या खिडकीमार्फत बंगल्यात गेला आणि अस्पष्टशा बोलण्याचा आवाज त्याच्या कानात शिरला. मात्र,बोलणे काय होत आहे ? हे त्याला कळत नव्हते.

त्याने ज्या खोलीची खिडकी उघडली होती फक्त त्याच खिडकीला गज नव्हते. ही सुद्धा त्याचीच करामत होती,म्हणूनच तर तो आज आत जाऊ शकत होता!! आत कोणी नसणार याची खात्री त्याला पहिल्यापासूनच होती. कारण, ती त्याची खास खोली होती शिवाय त्याने त्या खोलीची रचनाच अशी करून घेतली होती की, जीवन शिवाय कोणीही त्या खोलीत शिरण्याचा विचार देखील करू शकत नव्हते. त्याने दार जरासे उघडून पलीकडच्या खोलीत पाहिले, तेव्हा त्याला चार जण एक पेटी उचलताना दिसले मात्र त्या पेटीचा टाळा उघडलेला मात्र त्याला दिसला नाही. त्या टाळ्याकडे पाहताच अचानक त्याला काहीतरी आठवले फाईल!!! होय, फाईल त्याने त्याच पेटीत ठेवली होती आणि त्या फाईलमध्ये त्याने आतापर्यंत केलेल्या हेरखात्यातील कामांची माहिती होती. ती गोष्ट आठवल्यावर त्याचा संताप आणखीनच वाढला. कधी एकदा या चोरांना ‘चौदावे रत्न’ दाखवतो, असे त्याला झाले होते. पण त्याने तसे केले नाही. कारण, त्या ‘चार’ चोरांची गुहा कुठे आहे हे त्याला शोधून काढायचे होते.

ते चोर आता निघायच्या तयारीत आहेत असे पाहून तो मांजरासारखा, दबक्या पावलाने चोरांच्या मागून खाली आला. तेव्हा चार जण त्याने व्हॅनमध्ये चढताना दरवाजातून हेरले तो दुसऱ्या दरवाजाने बाहेर आला. जीवनने आपल्या स्टँडर्ड दुचाकीला चावी लावून सुरू केली, मात्र व्हॅन चालू होण्याच्या आवाजाखेरीज इतर आवाज ऐकू आले नाहीत. बंगल्याच्या आवारातून व्हॅन बाहेर पडताच कर्नलने त्यांचा पाठलाग सुरु केला. व्हॅन आणि जीवनची दुचाकी निर्मनुष्य अशा रस्त्यावरून धावत होती. अजूनतरी, व्हॅनमधील कोणालाही आपला पाठलाग होत असल्याची शंका देखील आली नव्हती. कारण, पाठलाग करणारा जीवन होता. शिवाय जीवन पाठलाग करण्यात किती ‘मुरलेला’ आहे हे त्या चोरांना कळणे अद्याप बाकी होते!! आता व्हॅन मुख्य रस्त्यावर आली होती आणि व्हॅनपाठोपाठ जीवन. व्हॅनने रस्ता बदलला, आता ती एका जुनाट अशा इमारतीसमोर येऊन थांबली. त्याच इमारतीच्या बाजूला आणखी एक थोडी उंचशी इमारत होती. त्या जुनाट इमारतीसमोर व्हॅन थांबताच जीवनने आपली दुचाकी दिसणार नाही, अशा ठिकाणी दडवली होती. जीवन इमारतीमागून त्या व्हॅनकडे वाकून पाहत होता. व्हॅनमधून चारजण उतरले चालक मात्र उतरलेला काही जीवनला दिसला नाही. या चारही जणांनी सर्व सामान बाहेर काढून त्या जुनाट इमारतीत न्यायला सुरुवात केली.पेटी नेण्यासाठी उचलण्यात आली,मात्र पूर्वीचे सामान ठेवायला लागणारा वेळ व ही पेटी ठेवायला लागणारा वेळ यामध्ये मोठा फरक होता. कारण, त्या पेटीचे वजनच तेवढे होते. "मी पेट्रोल भरून येतो, तुम्ही चला पुढे जेवायला" तात्याचे बोलणे ऐकताच चौघेही खूष झाले आणि निघून गेले जीवनला सर्वकाही स्पष्ट ऐकू येत होते. जीवनला मात्र पेट्रोल वा चार्जिंग संपण्याची

भीती नव्हती. कारण, ती दुचाकी होतीच तशी वाखाणण्याजोगी. त्या दुचाकीला कोणत्याही इंधनाची अथवा चार्जिंगची गरज नव्हती कारण तिच्या बॅट्र्या दुचाकी फिरतानाच पुन्हा चार्ज व्हायच्या. ते चारजण जाताच जीवन चालत त्या इमारतीसमोर आला. त्याने वर पाहिले असता, सर्वात शेवटच्या मजल्यावरील एका खोलीला बाल्कनी होती. हे चोर त्याच खोलीचा उपयोग करीत असल्याची शंका त्याला आली.

तो पुन्हा दुचाकी दडवलेल्या जागेच्या दिशेने भराभर चालू लागला. तो दुचाकी घेऊन त्याच रस्त्याने परत आला, पोर्चमध्ये दुचाकी पार्क करून तो बंगल्याच्या मागच्या दाराकडे आला. ते दार सताड उघडे होते मात्र चोरांनंतर कोणी तेथे फिरकण्याचीही भीती नव्हती. पण आपल्या घरात चोरी होऊच शकत नाही, अशी असलेली जीवनाची घमेंड आता पार जिरली होती. त्याने पडलेल्या वस्तू जागच्या जागी ठेवल्या व आपल्या खास खोलीच्या दारासमोर आला. चोरांनाही उघडणे कठीण झालेले ते दार जीवनने विशिष्ट अशा पद्धतीने पाच सेकंदातच पुन्हा उघडले. पण या खोलीतले दिवे 'त्याला' चालू करावे लागणार होते. त्याने दरवाजा ढकलला व पुन्हा बाहेर फ्रिजकडे आला. त्याने फ्रीज उघडून जे हातात येतील ते अन्नपदार्थ उचलले व सोफ्यावर बसून तो आधाशीपणे त्यावर तुटून पडला. खाऊन होताच तो आपल्या खास खोलीत आला. त्याने कपाटातली  स्टेनगन हातात घेतली आणि तिला बोटाएवढ्या आकाराचे एक सायलेन्सर बसवायला सुरुवात केली. आता त्याने कपाटातून काढलेले विशिष्ट असे ते बूट परिधान केले त्या बुटाचा सोल जाड रबरी असल्याने  जीवनने कितीही उड्या मारल्या तरी त्याचा आवाज येणार नव्हता. जीवन हातात एक विचित्रशी ‘छत्री’ घेऊन,बरोब्बर साडेअकरा वाजता घरातून निघाला, आणि तो दुचाकीवर स्वार होऊन बंगल्या पासून दूर दूर जाऊ लागला.

## *पैशांचा मृत्यू - 4

त्या शेवटच्या मजल्यावरील बाल्कनीच्या  खोलीत ते पाच जणांचे टोळके जमा झाले . त्या टोळीतला प्रत्येकजण मुंबईतला मुरलेला चोर होता. आता प्रत्येकालाच उत्सुकता लागली होती त्या 'पेटीची'. सय्यद पुढे झाला सुमारे तीस मिनिटांनी पेटी उघडली गेली, सर्वांच्या नजरा त्या खच्चून भरलेल्या नोटांवर पडल्या. पेटीचे झाकण उघडताच एक 'कुबट' वास प्रत्येकाच्या नाकात शिरला. पाचही जणांची तोंडे वाकडी झाली. भराभर त्यांनी नोटांची बंडले बाहेर काढायला सुरुवात केली, त्याखाली त्यांना लाललाल विटा पाहायला मिळाल्या. विटांच्या एका थराखाली त्यांना, एक फाईल मिळाली. सर्व विटा काढुन होताच, विटा काढणार्यांच्या अंगावर सरसरीत काटा उभा राहिला.

प्रेत!! होय, 'प्रेत' होते त्यात. एका कैद्याचे त्यांनी ते बाहेर काढले. नकळत त्यांच्याकडून एका मृतदेहाची चोरी झाली होती. आता हीच चोरी त्यांना भारी पडणार होती, आता त्यांना ते पैसेही नकोसे झाले होते. त्यांना ते पैसेही एका प्रकारे मृतदेहाचाच भाग वाटू लागले होते, मृत्यू! होय 'पैशांचा मृत्यू' पाहिला होता त्यांनी. त्या पाचही जणांना थंडीतही दरदरून घाम फुटला, "काय करायचे?" नाकावरील रुमाल सैल करत  हुसेनने विचारले." कुठेतरी पुरून येऊ याला" सय्यदने घाई केली. त्यांनी बाहेर काढलेले शव पुन्हा पेटीत टाकले आणि मनातल्या मनात स्वतःला शिव्या हासडत काढलेल्या विटा पुन्हा पेटीत टाकायला सुरुवात केली. ती पेटी त्यांच्या काळ्याकुट्ट व्हॅनमध्ये लादण्यात आली, व्हॅन चालू होताच चौघेही धडाधड व्हॅनमध्ये घुसले. व्हॅन भर वेगात निघून गेली. ती एका निर्जन ठिकाणी नेऊन थांबली, व्हॅन जवळजवळ स्मशानाला लागूनच उभी होती यावेळी व्हॅनमधून ‘पाचही’ जण उतरले त्यांनी ती पेटी बाहेर काढली आणि व्हॅनमधून  कुदळ-फावडे घेऊन लगतची जमीन खोदायला सुरुवात केली, ते त्या पेटीची विल्हेवाट लावून पुन्हा व्हॅनमध्ये  बसले आणि व्हॅन ने वेग धरला.

एक माणूस भर थंडीच्या दिवसात हातात ‘छत्री’ घेऊन रस्त्यावरून चालत होता. तो जीवन होता, चालत चालत तो एका इमारतीसमोर आला, ती जुनाट अशी इमारत होती. त्या इमारतीच्या बाजूला तशीच, पण थोडी कमी उंचीची जुनी इमारत होती. तो समोरील इमारतीत शिरला आणि थेट त्या इमारतीच्या टेरेसवर आला. त्यावेळी त्याच्या व्यतिरिक्त तेथे कोणीच नव्हते. त्याने एक दुर्बिन काढली नी त्या कमी उंचीच्या इमारतीला तो, दुर्बिणीच्या सहाय्याने न्याहाळू लागला. आता त्याचे लक्ष त्या इमारतीच्या शेवटच्या मजल्यावरील, बाल्कणीच्या घराकडे होते. जेव्हा त्या घरात त्याला काहीच हालचाल दिसली नाही, तेव्हा त्याने हीच संधी साधायचे ठरवले. त्याच्या हातातील छत्री त्याने सरळ पकडली व सहजच इमारतीच्या उंचीचा अंदाज घेण्यासाठी खाली वाकून पाहिले, आणि त्याचे शरीर एकदम शहारल्यासारखे झाले. आता थोडी जरी चूक झाली तरी त्याच्या शरीराचे एखाद हाडदेखील अभंग राहण्यासारखे नव्हते, तो तसाच सात-आठ पावले मागे आला, आणि धावत जाऊन त्याने टेरेसच्या कट्ट्यावरून उडी घेतली. उडी घेताच त्याने वर केलेल्या छत्रीचे विचित्र आकाराचे बटन दाबले. छत्रीसोबत तो वेगाने खाली जाउ लागला, मात्र छत्रीमुळे त्याचा खाली जाण्याचा वेग बराच कमी झाला होता. खाली येता येता त्याने समोरील घराच्या बालकणीला पकडले, नी झटक्यात उडी घेऊन तो आत गेला. त्याने खिडकी उघडून घरात प्रवेश केला, आत जाताच त्याने घरभर विटांचा चुरा पडलेला पाहिला. बाजूलाच त्याची फाइल नी पैसे पडलेले त्याला दिसले, लगेच त्याने खिशातून एक मोठी पिशवी काढून त्यात ते पैसे भरायला सुरुवात केली. तेवढ्यात त्याला दरवाजावर काहीतरी आदळल्यासारखे वाटले. तो गर्रकन मागे वळला, तीन जण त्या 'बलपूर्वक' उघडलेल्या दरवाजातून आत येताना त्याने पाहिले. त्या तिघांनी जीवनवर स्टेनगन रोखल्या होत्या. जीवन एकाएकी बुचकळ्यात पडला. हा आपल्याला पकडण्याचा सापळा होता की काय असे त्याला वाटले; “तुम्ही कोण”,जीवनने प्रश्न केला. “आम्ही रॉय एजन्सी चे डिटेक्टिव आहोत, दोन्ही हात वर कर नी उभा रहा चलाखी करण्याचा प्रयत्न केलास तर गोळी घालीन", अर्जुन रॉय पुढे होत म्हणाला. “आणि तुझे बाकीचे साथीदार कुठे आहेत?” त्यातील एकाने प्रश्न करताच जीवन म्हणाला "ओह! तर तुम्ही ते तिघे रॉय बंधू आहात. ज्यांचे नाव ऐकताच मोठमोठ्या गुन्हेगारांच्या तोंडचे पाणी पळून जाते” , " हे बघ जास्त बोलू नकोस जेवढे विचारले जाईल तेवढेच सांग", राहूल त्याच्यावर खेकसला. "थांबा, आधी ही फाईल वाचा." जीवन फाईल पुढे करत म्हणाला . राहुल ने फाईल हातात घेऊन त्यातील काही पाने उलटली आणि जीवनला एक कडक सॅल्युट ठोकून म्हणाला." झालेल्या गैरसमजाबद्दल आम्ही तुमच्याकडून माफी मागतो. हे चोर आठवड्याभरापूर्वी भर‘दुपारी’ एका बंगल्यात चोरी करून पळाले होते, ही टोळी कुठे गेली असावी यावेळी ? निश्चितच आपल्याला याविषयी काहीतरी माहिती असेलच. ", "नक्कीच त्यांनी ती पेटी उघडली असणार, त्याच पेटीची विल्हेवाट लावण्यासाठी गेले असावेत" एवढे बोलून जीवन दिव्यांच्या बटनांकडे वळला बराचवेळ तो तिथे काहीतरी ठोकाठोकी करत होता. सगळे उद्योग समाप्त होताच, "मघाशी तुम्ही कोणत्या पेटीबद्दल म्हणालात ?", तिघांनी एकदमच विचारले. “फार मोठी कथा आहे त्याची. नंतर सांगेन, मात्र आता सांगतो तसे करा". जीवन हुकमी स्वरात तिघांनाही म्हणाला.

बराच वेळ त्या खोलीतून बोलण्याचे आवाज येत होते, ते आता बंद झाले होते. ती खोलीसुद्धा बंद होती. खूप वेळ कोणीच त्या खोलीत गेले नाही. सुमारे अर्ध्या-पाऊण तासाने एकजण त्या खोलीचे दार उघडू लागला, तो दार उघडताच आत शिरला. त्याच्या मागोमाग घामाघूम अवस्थेत चारजण खोलीत शिरले. तेवढ्यात त्या खोलीत एकाची किंकाळी घुमली त्यापाठोपाठ एकामागोमाग एक अशा चार किंकाळ्या दिवा चालू होताच त्या खोलीत उमटल्या, आणि "आता तुमचे पळून जाणे कठीण आहे!" सताड उघड्या दारातून आलेले तीन भाऊ एकत्र म्हणाले. "अरे भरत हे पहा. मला वाटलं, कर्नलसाहेबांचा नेम चुकतो की काय!" अर्जुन आश्चर्यचकित होऊन म्हणाला. "तेच, मलासुद्धा वाटले की फक्त स्टेनगनने इतका अचूक निशाणा लावणे कसे शक्य आहे?" ह्या दोघांची बोलणी चालू असतानाच राहुल

मात्र दिव्याच्या बटणावरील भिंतीत, ‘जीवनने’ ठोकलेल्या चापात अडकलेले, रक्तबंबाळ बोट बाहेर काढण्याच्या प्रयत्नात असलेल्या चोरावर स्टेनगन रोखुन उभा होता आणि जीवन तर, आपल्या स्टँडर्ड दुचाकीवरून घरी चालला होता. त्यावेळी त्याच्या दुचाकीला एक छत्री आणि एक नोटांनी खच्चून भरलेली पिशवी लटकत होती, त्यात त्याची फाईल सुद्धा होती.

आता त्याचा निवृत्ती घेण्याचा विचार पूर्णपणे बदलला होता,आणि तो हे पैसे अनाथ आश्रमाला दान करणार होता. आता ते पैसे त्याच्यासाठी 'मृत' झाले होते.